Impact Factor-8.632 (SJIF) ISSN-2278-9308
Volume-B ISSUE No - (CDVIII) 408

# B.Aadhar

Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

April -2023

## Pandit Jawaharlal Nehru and Democratization of India



Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor
Dr.Vasant D.Satpute
Principal
Late Ramesh Warpudkar
ACS College, Sonpeth
Dist.Parbhani

Assistant Editors
Dr. Vitthal K. Jaybhaye
Dr. Bapurao V. Andhale
Late Ramesh Warpudkar
ACS College, Sonpeth
Dist.Parbhani

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : *www.aadharsocial.com*

Aadhar Publications

Late Ramesh Warpudkar A.C.S College Sonpeth Pin-431516 Sonpeth Dist.Parbhani


| | | |
|---|---|---|
| 21 | पंडित नेहरू : लोकशाही आणि वैश्विक दृष्टी प्रा. डॉ.विठ्ठल स. जाधव | 69 |
| 22 | पंडित नेहरू यांचे सर्व समावेशक लोकशाही संबंधीचे विचार प्रा. जोगदंड मकरंद बळीराम | 73 |
| 23 | पंडित जवाहरलाल नेहरू व भारतीय लोकशाही प्रा.डॉ. सतिश रावसाहेब कदम | 76 |
| 24 | पंडित जवाहरलाल नेहरू आणि अलिप्ततावादाचे धोरण -एक राजकीय अभ्यास डॉ.सुरेश रावसाहेब खिस्ते | 79 |
| 25 | पंडित जवाहरलाल नेहरू आणि समाजवाद प्रा. डॉ. अतुल एन. खोटे | 82 |
| 26 | पंडीत जवाहरलाल आणि कृषी विकास प्रा. डॉ. गजानन बाबुराव मरगीळ | 86 |
| 27 | पंडित जवाहरलाल नेहरू यांचे साहित्यिक योगदान डॉ. मोरे संगीता दत्ताजी | 88 |
| 28 | पंडितजवाहरलाल नेहरू आणि धर्मनिरपेक्षता डॉ.मोटे गीतांजलीस दाशिवराव | 91 |
| 29 | पंडित जवाहरलाल नेहरू यांचे समाजवादी विचार प्रा.डॉ. अशोक ए.मोटे, प्रा. पठाण टी. एस | 95 |
| 30 | पंडित जवाहरलाल नेहरू यांचे राजकीय व शैक्षणिक विचार मुळे रामेश्वर जनार्धन | 99 |
| 31 | नेहरू : लोकशाहीचे अभ्यासक नागरगोजे प्रदिपकुमार बबन, प्रा. डॉ. विश्वनाथ महादेव आवड | 104 |
| 32 | पंडित नेहरूंचे लोकशाही विषयक विचार डॉ. रमेश जगन्नाथ निकम | 109 |
| 33 | पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या आर्थिक विकासाचे प्रारूप डॉ. चारूशिला विजयराव पाटील | 112 |
| 34 | पंडित नेहरू यांचे पंचशील तत्वे प्रा. मनोजकुमार रामदासराव पवार | 116 |
| 35 | लोकशाही विकेंद्रीकरणात नेहरूजींची भूमिका डॉ. पिनाटे के. पी. | 118 |
| 36 | पंडित जवाहरलाल नेहरू यांचे परराष्ट्र धोरण डॉ. साहेब राठोड | 121 |
| 37 | भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासात पंडित नेहरूंचे योगदान: एक अभ्यास डॉ.बालाजी आनंदराव साबळे | 123 |
| 38 | पंडित जवाहरलाल नेहरूंचे भारताच्या विकासातील योगदान डॉ.प्रा. कदम हरिभाऊ पांडुरंग, शेख कादर समंदर | 126 |
| 39 | पंडित नेहरूंचे अलिप्ततावादी धोरण डॉ. निलेश गोकुळ शेरे | 131 |
| 40 | पंडित जवाहरलाल नेहरूंचे काश्मीर विषयक भूमिका प्रा. डॉ. स्वामी विरभद्र गुरप्पा | 135 |
| 41 | पं.जवाहरलाल नेहरू: विकासाचा वैज्ञानिक दृष्टिकोन डॉ.टेकाळे ए.डी. | 140 |
| 42 | पंडीत नेहरू यांचे आलीप्तवादी धोरण संदिप बंडू तुपमिंद्रे,डॉ.प्रा. कदम हरिभाऊ पांडुरंग | 143 |
| 43 | पंडित नेहरूजींची परराष्ट्र धोरणातील भूमिका डॉ.अंभुरे एस.डी. | 146 |

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal

Impact Factor -(SJIF) -8.632, Issue NO, (CDVIII) 408-B

ISSN : 2278-9308 April, 2023

# पंडित नेहरूजींची परराष्ट्र धोरणातील भूमिका

डॉ.अंकुर एम.डी.
इतिहास विभाग के.रमेश वरपूडकर महाविद्यालय सोनपेठ
मो.9511954276

## प्रस्तावना

आधुनिक भारताच्या राजकारणामध्ये पंडित नेहरूंचे अग्रहाने नाव घेतले जाते. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर नवीन राष्ट्राच्या उभारण्याच्या कार्यात त्यांचे फार मोठे योगदान आहे. त्यामुळे त्यांना आधुनिक भारताचे शिल्पकार असे म्हटले जाते. पंडित जवाहरलाल नेहरू हे भारताचे पहिले पंतप्रधान होऊन गेलेले आहेत पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्म १४नोव्हेंबर १८८९रोजी अलाहाबाद मध्ये झाला. त्यांच्या व्यक्तिमत्वावर व विचारावर महात्मा गांधी आणि त्यांचे वडील मोतीलाल नेहरू यांचा प्रभाव पडल्याचा आपल्याला दिसून येतो.पंडित जवाहर नेहरूजी हे उदारमतवाद असे धर्म सहिष्णुता व धर्मनिरपेक्ष या गुणांचे त्यांच्यावर संस्कार झाले होते.कारण आनंद भवनात हिंदू ,मुस्लिम व इंग्रज ,यांच्या मिश्र संस्कृतीचे समन्वय केंद्र होता. नंतर त्यांना वयाच्या १५ वर्षी उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला पाठवले हॅरो नंतर केंब्रिज येथील शिक्षण केंद्रात शिक्षण घेण्यासाठी पाठवले. अध्ययन काळ त्यांनी रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र, भूगर्भशास्त्र, हे विषय घेऊन १९१०मध्ये जवाहरलाल पदवी परीक्षा उत्तीर्ण झाले ,नंतर त्यांनी कायद्याचा अभ्यास केला व १९१२ मध्ये टेंपल मधून परीक्षा देऊन बॅरिस्टर झाले, व नंतर भारतात परत आले. १९१६ मध्ये महात्मा गांधी सोबत त्यांची प्रथम भेट झाली. तेव्हा गांधीजींच्या विचाराशी प्रभावित झाले नंतर पंडित नेहरूंचा १९१६ ला कमलाबाई यांच्याशी विवाह झाला १९२० नंतर जवाहरलाल नेहरू ची व्यक्तिमत्व अधिकाधिक प्रभावी बनत गेले.पुढे १९२९ च्या लाहोर मध्ये झालेल्या भारतीय काँग्रेसचे अधिवेशनाचे अध्यक्ष होते. राजकारणात प्रवेश घेण्यासाठी लोकमान्य टिळक आणि यांनी एनी बेझंट यांचा होमरूल लीग चळवळीतून भाग घेऊन राजकीय जीवनाचा प्रारंभ केला. गांधीच्या सहवासात आल्याने राजकारणाचा प्रत्यक्ष चळवळीत हिरीरीने भाग घेतल्यास त्यांना अनेक वेळा तुरुंग वासाहीत भोगावे लागला.१९१९ मध्ये होमरूल चळवळीचे अध्यक्ष बनले १९२० ला उत्तर प्रदेशात किसान मोर्चा काढला .१९२३मध्ये पंडित नेहरू अखिल भारतीय परिषदेचे सरचिटणीस बनले. २५ २६मध्ये त्यांनी इटली, इंग्लंड, बेल्जियम, जर्मनी, रशिया, देशाचा दौरा केला व १९२६ मध्ये नेहरू पुन्हा काँग्रेसचे

गटाने साम्यवादी शासन पद्धतीचा पुरस्कार केला होता. लोकशाही गटाचे नेतृत्व अमेरिका हा देश करीत होता तर साम्यवादी गटाचा रशिया हा देश नेतृत्व करीत होता. या दोन्ही देशात शीतयुद्ध सुरू झाले होते .परंतु हे दोन्ही राष्ट्र जगातील शक्ती शाली राष्ट्र म्हणून पुढे येत होती .तेव्हा पंडित जहर नेहरूजींनी आपल्याला या दोन्ही गटात सामील व्हायचं नाही असं त्यांनी ठरविलं किंवा जागतिक राजकारणापासून आपले स्वातंत्र्य आबादी ठेवण्यासाठी अलिप्त राहण्याचे धोरण त्यांनी स्वीकारले .जगातील एका राष्ट्राचे दुसऱ्या राष्ट्राची सामाजिक. आर्थिक. राजकीय. सांस्कृतिक. इत्यादी प्रकार संबंध येत असतात तेव्हा त्यामध्ये परस्पर विसंगती आणि संघर्ष निर्माण होण्याची शक्यता असते. अशावेळी आंतरराष्ट्रीय व्यवस्था सुरळीत करणे आवश्यक असते .त्यानुसार परराष्ट्र धोरण ठरावे लागते . तेंव्हा पंडित जवाहरलाल नेहरूंनी परराष्ट्र धोरणात अलिप्तते चे धोरण स्वीकारले.

नेहरूंच्या परराष्ट्र धोरणाचे किंवा परराष्ट्र नीतीचे घटक

१) साम्राज्यवाद आणि वसाहतवादाला विरोध
२) अतिरेकी आक्रमक राष्ट्रवादास विरोध व आंतरराष्ट्रीय सहकार्य
३)१९३८ मध्ये स्पॅनिश लोकसत्ताक समाजवादी सरकार विरुद्ध बंड करून ज.फॅको याने स्पेन मध्ये प्रस्थापित केलेली हुकूमशाही राजवर फॅसिझम .नाझिझम आक्रमण राष्ट्रवाद यांच्या नेहरूंनी निषेध केला होता.
४) वंशद्वेश व वर्ण द्वेशा विरोध:-
५) लष्करी गटाचे राजकारणापासून अलिप्त राहणे
६) जगातील सर्व राष्ट्राच्या स्वातंत्र्यलढ्यास पाठिंबा देणे
७) देशा देशातील स्पर्धात्मक आर्थिक शोषणास विरोध करणे
८) युद्ध शांतता व नी. शस्त्रीकरणा संबंधी पुढाकार घेणे.
९) भारताच्या विकास कार्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकारी मिळवणे.

४) पंडित जवाहरलाल नेहरूंच्या परराष्ट्र धोरणाचे उद्दिष्टे:-

१) आंतरराष्ट्रीय क्षेत्रात शांतता व सुव्यवस्था निर्माण करणे.
२) प्रत्येक देशाला आपले परराष्ट्र धोरण निर्धारित करण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजेत.
३) वसाहतवाद व साम्राज्यवादाला विरोध करणे.
४) देशाचा जलद गतीने आर्थिक विकास करण्याच्या दृष्टिकोनातून परराष्ट्र धोरण स्वीकारणे.
५) भारताच्या प्रादेशिक अखंडत्वाचे रक्षण करणे.
६) स्व निर्णयाच्या तत्त्वाचा पुरस्कार करणे.
७) युरोप आशिया ऑस्ट्रेलिया आफ्रिका व अमेरिका खंडातील भारतीयांना मदत करणे.
८) परकीय क्षेत्र पासून संरक्षण करणे.
९) आशिया व आफ्रिकेतील राष्ट्रांना विनोत प्रवेश मिळवून देणे.
१०) कोणत्याही दोन देशात निर्माण झालेले तंटे शांततापूर्ण सोडावेत.

नेहरू व आंतरराष्ट्रीय लष्करी करार संघटना अमेरिका प्रणित

पंडित जवाहरलाल नेहरू यांनी आंतरराष्ट्रीय कोणत्या लष्करी करारात अडकून पडायची नाही हे धोरण स्वीकारल्याचे आपल्याला दिसून येते. म्हणूनच त्यांनी १९५७ मध्ये लोकसभेतील एका भाषणात असे म्हटलेजागतिक राजकारणात आज दोनच मार्ग आहेत व प्रत्येक राष्ट्राला यापैकी कोणता तरी एक मार्ग शोधावा लागेल असे आग्रही प्रतिपादन अनेकदा केले जाते. परंतु मला हे मान्य नाही .कारण आपल्याला दोन्ही विचारधार्याकडे न जाता आपल्याला स्वतंत्र राहता येते. कारण आपण कोण्या तरी एका संघटनेत प्रवेश केला तर आपण त्यात गुंतून बसणार म्हणून ह्या लष्करी कराराच्या संघटना आहे त्यामध्ये आपल्याला सहभागी नको आहे यात NATO.SEATO.CENTO या तिन्ही लष्करी करारात नेहरूजी सहभागी झाले नाहीत आमच्या राष्ट्रीय हितसंबंधाचे संरक्षण ज्या द्वारे होईल त्या बाजूनेच आम्ही युद्धात उतरू. त्या बाजूनेच युद्धात उतरू त्यामुळे देशात व जागतिक शांतता टिकून राहील अशी नेहरूंची खात्री होती .म्हणूनच या धोरणाला जॉन कॅनेडी यांनी १९६१ मान्यता दिली. असलग्नता चळवळीस सुरुवात करण्यास भारत. इजिप्त. इगोस्लाव्हिया या राष्ट्राने आपली भूमिका बजावली. यातूनच भारताने चीनची जो पंचशील करार केला तो भारताच्या परराष्ट्रनीतीचा महत्त्वाचा टप्पा होता.

भारत -चीन पंचशील करार

आशिया खंडात शांतता निर्माण व्हावी व शेजारी राष्ट्राबरोबर आपले स्नेहसंबंध चांगल्या प्रकारे टिकून राहावेत . या हेतूने भारत- चीन.पंचशील करार करण्यात आला होता. १९५४ मध्ये चीनचे पंतप्रधान चौ. एन. लाभ हे भारत भेटीवर आले तेव्हा पंडित जवाहरलाल नेहरूंनी आशियात शांतता निर्माण होण्यासाठी किंवा या प्रदेशात शांतता

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (CDVIII) 406-B
ISSN : 2278-9308 April, 2023

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

असावी .असे पंडित नेहरूंना वाटले होते. चीनच्या पंतप्रधान बरोबर चर्चा केली. त्यांनी सहमती दाखविल्या नंतर पुढेऑक्टोबर १९५४ ला नेहरुंनी चीनला भेट दिली. तेव्हा दोन्ही देशाच्या पंतप्रधानांनी १९५४ ते ५५ भारत चीन भाई भाई या घोषणा दिल्या गेल्या. आणि दोन्ही देशात २९ एप्रिल १९५४रोजी पंचशील करार करण्यात आला .या करारानुसार एकमेकांच्या सार्वमत्वाला आणि राज्याच्या सीमांचा आदर करावा . तसेच दोन्ही देशांनी परस्परावर आक्रमण करू नये .तसेच दुसऱ्याच्या अंतर्गत राज्यकारभारत हस्तक्षेप करू नये .याचबरोबर समानता आणि परस्पराचे हित सांभाळावे .शांततामय सहजीवनाने आर्थिक सहकार्याची भूमीकेची स्वीकार करावा. परंतु चिन् ने १९६२ साली भारतावर आक्रमण केले आणि ह्य कराराचा भंग केला.

नेहरूंचे रशियाशी संबंध

भारत रशिया यांचे संबंध इ. स.१९४७ ते १९५० या काळापर्यंत म्हणावे तेवढे सुधारलेले नव्हते, परंतु पंडित नेहरूंनी आपली भगिनी श्रीमती विजयालक्ष्मी पंडित यांची रशियाची राजदूत म्हणून नियुक्ती केली होती. त्या भारताच्या पहिल्या महिला राजदूत म्हणून रशियामध्ये गेल्या होत्या. तेव्हा भारताला रशियाने १९४९ मध्ये अन्नधान्याचा पुरवठा केला. तसेच १९५३ला भारत रशियात व्यापारी करार झाला. भारताला उद्योग क्षेत्रात विनाअट सहकार्य केले. १९५५५ ला पंडित नेहरूंनी रशियाला भेट दिली तेव्हा. रशियाने भारताच्या असलग्नतेच्या धोरणास पाठिंबा दिला होता .पंडित नेहरू चे धोरण पटल्यामुळे रशियाने काश्मीर - गोवा या प्रश्नावर पाठिंबा दर्शविला. रशियाचे नेते कुश्चेव्ह बेल्गनीन यांनी भारताला भेट दिल्यामुळे .भारत रशियात मैत्री समान द्रड झाली.१९६२ च्या भारत -चीन युद्धाच्या वेळी रशियाने भारताची बाजू उचलून धरली. पंडित नेहरू पंतप्रधान असताना रशिया आणि भारताला विद्युत निर्मितीचे प्रकल्प. पोलाद प्रकल्प. खनिज तेल .उत्पादन क्षेत्रात मोलाचे सहकार्य केले. इसवी सन१९६० मध्ये भारत रशियात सांस्कृतिक करार झाला. त्यानुसार वैज्ञानिक. तंत्रज्ञ .साहित्य .कलाकार इत्यादीच्या क्षेत्रात दोन्ही देशांच्या भेटी वाढल्या.

नेहरूंच्या च्या काळात इंग्लंड -भारत संबंध

भारत स्वतंत्र्यासाठी पंडित नेहरूंनी इंग्लंडची लढा दिला असला. तरी स्वातंत्र्याच्या नंतर इंग्लंड व भारताचे मैत्री संबंधित प्रस्थापित केले गेले. कारण पंडित नेहरू म्हणतात ब्रिटिशांकडून आपणास इंग्रजी भाषा. ब्रिटिश शासन पद्धती व संसदीय शासनपद्धती या तीन महत्त्वाच्या बाबी मिळाल्या आहेत. म्हणून भारताने इ. स.१९४९मध्ये राष्ट्र कुलाचे सदस्यत्व स्वीकारले होते. कारण काश्मीर प्रश्न. नद्याचे प्रश्न. निर्वासस्थांची मालमत्ता. राजकीय. आर्थिक. शैक्षणिक. तांत्रिक संरक्षण व्यवस्था. गोवा प्रश्न .सुएज कालवा प्रश्न. भारत-चीन युद्धाच्या वेळी ५.३५% दशलक्ष भारताला ब्रिटनची लष्करी मदत केलेली होती. नेहरूंचा आंतरराष्ट्रीय राजकारणाचा सखोल अभ्यास होता .त्यांनी केलेले जगप्रवास अनेक परिषदेमध्ये घेतलेला सहभाग यांचा उपयोग झालेला दिसतो.

नेहरूंचे शेजारी देशाशी संबंध

भारताच्या उत्तर सीमेलगत असलेले छोटेसे राष्ट्र नेपाळ असून तो प्रगतशील बनावे अशी भारताची भूमिका आहे. पंडित नेहरू म्हणतात एक आद्यात प्रतिबंधक राष्ट्र या नात्याने नेपाळचे भारतात महत्त्व होते. म्हणून १९५० आली भारताने नेपाळशी कायम शांतता व मैत्री करार केला होता .मैत्री करारा प्रमाणे औद्योगिक व आर्थिक मदत . सार्वभौमत्व व प्रादेशिक अखंडत्व. जलसिंचन. आरोग्य. शिक्षण. रेल्वे. धरण . ग्रामविकास. विद्युत निर्मिती. व्यापारात वाढ या क्षेत्रात भारताने सहकार्य होते. नेपाळ प्रमाणेच भारताने भूतान या राष्ट्राची ८ ऑगस्ट १९४९ रोजी कायम शांतता व मैत्रीचा करार केला होता. त्यानुसार पंडित नेहरूंनी भूतानला १९५८ भेट दिली. भूतांच्या प्रादेशिक सीमे बाबत कटकटी निर्माण झाल्या. तेव्हा १८ऑगस्ट १९५९ रोजी नेहरूजीं म्हणाले भुतांच्या प्रादेशिक आभाधीत्वाची व संरक्षणाची जबाबदारी भारताची असल्याने भूतान वर आक्रमणे भारताविरुद्ध आक्रमणे मानले जाईल. भूतान प्रमाणेच नेहरूजींनी ४ जानेवारी १९५० ला अफगाणिस्तान बरोबर मैत्री करार घडवून आणला व दोन्ही देशात शांतता .कृषी औद्योगिक .राजनैतिक संबंध. व्यापार संबंध. प्रस्थापित व्हावे त भारत अफगाणिस्तान यांच्या ४ ऑगस्ट १९६३ ला संस्कृतीक करारानुसार शिक्षण, कला क्षेत्रात चालना देण्याचे ठरले. भारताचे स्वातंत्र्यानंतर श्रीलंकेशी फारशे चांगले संबंध प्रस्थापित नव्हते परंतु १९५६ नंतर डब्ल्यू. आर .डी. वंदरनायक या पंतप्रधानांच्या काळात भारत श्रीलंका संबंध सुधारले होते. श्रीलंकेने गोवा मुक्ती लढा .काश्मीर प्रश्न भारताची बाजू घेतली होती. अशा प्रकारे पंडित नेहरूंनी आपल्या परिस्थिती धोरणात शेजारी राष्ट्राबरोबर अतिशय चांगले संबंध ठेवल्याचे दिसून येते

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (CDVIII) 406-B
ISSN : 2278-9308
April, 2023

समारोप:

वरील सर्व घटकातून पंडित जवाहरलाल नेहरू यांनी भारताच्या परराष्ट्र धोरणाचा धोरणात फार मोठी कामगिरी केल्याचे दिसून येते. पंडित जवाहरलाल नेहरूंनी साम्राज्यवाद, वसाहतवाद, वंशभेद, आक्रमण कारवाया इत्यादी विरुद्ध व्यासपीठावरून सातत्याने लढे दिले तसेच जागतिक शांतता टिकण्यासाठी आंतरराष्ट्रीय क्षेत्रात नेहरूजींची महत्त्वाची भूमिका दिसून येते. लोकशाही व धर्मनिरपेक्ष या भरभक्कम पायावर त्यांनी भारताची राज्यव्यवस्था समाजवादाचा राष्ट्रापुढे ठेवलेला आदर्श राष्ट्राच्या अर्थकारणाला नियोजनाचा दिलेला बलशाली आधार आणि भारताच्या हीत संबंधाला पोषक ठरलेले त्यांचे परराष्ट्र धोरण महत्त्वाचे ठरले आहे.

संदर्भ ग्रंथ:-

१) स्वातंत्र्य भारताचा डॉ.सुमन वैद्य डॉ.शांता कोठेकर
२) आधुनिक भारतातील राजकीय विचार-डॉ.भास्कर लक्ष्मण भोळे
३) जवाहरलाल नेहरू आत्मचरित्र-नारायण गणेश गोरे
४) भारताचे परराष्ट्र धोरण-प्रा.व्ही.एन.इंगोले प्रा.आर.डी. साबळे
५) मराठी आधुनिक भारताचा इतिहास-डॉ.अनिल कटारे

PRINCIPAL


Website – www.aadharsocial.com Email – aadharsocial@gmail.com.